## निवडक

### पिर्ण शांतादुर्गा देवीचा उद्या वर्धापनदिन



■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. ५ :** पिर्ण येथील शांतादुर्गा देवीचा ६८ वा वर्धापनदिन दि. ७ फेब्रुवारी रोजी विविध धार्मिक तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांनिशी साजरा होणार आहे. सकाळपासून धार्मिक विधींना सुरुवात होईल. त्यानंतर तीर्थप्रसाद होणार आहे. रात्री १० वाजता दशावतारी नाटक होईल. भाविकांनी या उत्सवाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन देवस्थान समितीतर्फे करण्यात आले आहे.

---

### आमोणकर विद्यामंदिरात दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप



■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. ५ :** जी. एस. आमोणकर विद्यामंदिराच्या सभागृहात सकाळी ११ वाजता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ झाला. शाळेत दहावीचे एकूण १६९ मुले होती. कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या उपमुख्याध्यापिका झेना व्हियेगस यांनी शाळेची प्रार्थना म्हणून केली. त्यानंतर शाळेच्या उपमुख्याध्यापिका झेना व्हियेगस, शाळेचे माजी मुख्याध्यापक आवरियो कुन्हा गोम्स, शाळेचे अध्यक्ष ॲड. संजय उसगावकर, विद्यार्थी अथर्व नाईक, श्रीगणेश सावंत, मनस्व खोराटे आसीम खुरैशी, गौरवी अय्यर यांची समर्पक भाषणे झाली. शिक्षिका पुनम नाईक व मोहिनी हळर्णकर यांनी कविता सादर केल्या. त्यानंतर नवीन शालेय विद्यार्थी प्रमुख विद्यार्थी अथर्व नाईक व सेवा परब यांनी शपथ विधी केली व स्वीकृती भाषण दिले. शालेय परंपरेनुसार दहावीच्या विद्यार्थ्यांचा हस्ते दीप प्रज्वलित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रीकित केरकर व मेहक शेख या विद्यार्थ्यांनी केले.

---

### 'स्वर लहर' संगीताचा कार्यक्रम सांगोल्डा येथे रंगला



**सांगोल्डा : गाताना समृद्ध चोडणकर. सोबत अक्षय नाईक, गौतमी हेदे व साथी कलाकार.**

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ५ :** श्री शांतादुर्गा सांगोडकरीण, देवस्थान सांगोल्डाच्या वर्धापनदिनानिमित्तर विष्णू शिरोडकर यांनी यांच्या 'स्वर लहरचा' विविधरंगी सुगमसंगीताचा कार्यक्रम सादर झाला. अक्षय नाईक यांनी ओंकार अनादी अनंत, जेव्हा तुझ्या बटाना ,सूरत पिया किन,कानडा विठ्ठल, आणि माऊली माऊली अशी गीते सादर केली.

समृद्ध चोडणकर यांनी राम सियाराम भेटला विठ्ठल आणि इतर हिंदी गाणी पेश करुन जान आणली तर गौतमी हेदे बांबोळकर यांनी शांतादुर्गा आई दामबाबा तू पांव , पांडुरंग नामी भाग्यदा लक्ष्मी अशा गीतांनी रंगत आणली. वाद्यवृंद साथ सुरजीत थळी अवधूत चारी, प्रकाश अमोणकरआणि विष्णू शिरोडकर यांची होती. ध्वनी व्यवस्था विनोद शिरोडकर यांनी सांभाळली होती. मानसी वाळवे हिने निवेदन केले.

---

### मुरगाव नगरपालिका क्षेत्रात गतिरोधक उभारण्याचे आदेश

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ५ :** दक्षिण जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी मुरगाव तालुक्यातील मुरगाव नगरपालिका क्षेत्रातील अंतर्गत रस्त्यांवर हंप प्रकारचे गतिरोधक अधिसूचित केले आहेत आणि त्यावरील सावधानतेचे फलक लावण्याचे निर्देश दिले आहेत. वडडेम जंक्शन राष्ट्रीय महामार्ग ३६६ पासून लास्ट बस स्टॉप न्यू वाडेकडे जाणाऱ्या अंतर्गत रस्त्यावर, मुख्य जंक्शनच्या सुमारे २० मीटर आधी आणि सुमारे ३० मीटर नंतर एक हंप प्रकारचा गतिरोधक उभारण्यात येईल.

त्याचप्रमाणे लिटिल एंजल स्कूलच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या पुढे सुमारे ५ मीटर अंतरावर, वाडे जंक्शन राष्ट्रीय महामार्ग ३६६ पासून लास्ट बस स्टॉप न्यू वाडेकडे जाणाऱ्या अंतर्गत रस्त्यावर एक हंप प्रकारचा गतिरोधक उभारला जाणार आहे. तसेच मांगूरहून बायणाकडे जाणाऱ्या अंतर्गत रस्त्यावर, अंबाबाई मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारापासून सुमारे १० मीटर अंतरावर, एक हंप प्रकारचा गतिरोधक उभारण्यात येणार आहे.

खारीवाडेहून चिखली–मांगूरकडे जाणाऱ्या अंतर्गत रस्त्यावर टी चौकाच्या सुमारे १५ मीटर अंतरावर एक हंप प्रकारचा स्पीड ब्रेकर उभारण्यात येणार आहे, ड्रीम लँड टी इंटरसेक्शनच्या सुमारे १५ मीटर अंतरावर फादर जोस वाझ अंतर्गत रस्त्यावर एक हंप प्रकारचा गतिरोधक उभारण्यात येणार आहे, वास्कोहून वरुणापुरीकडे जाणाऱ्या अंतर्गत रस्त्यावर मुख्य मांगूर हिल जंक्शनच्या सुमारे २० मीटर अंतरावर एक हंप प्रकारचा गतिरोधक उभारण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे मुख्य मांगोर हिल जंक्शन नंतर सुमारे ५० मीटर अंतरावर म्हणजे वास्को स्पोर्ट्स क्लबच्या अगोदर. मुख्य मांगोर हिल जंक्शनपासून सुमारे १० मीटर अंतरावर, मांगोर हिल जंक्शनपासून बायणाकडे जाणाऱ्या अंतर्गत रस्त्यावर एक हंप प्रकारचा गतिरोधक उभारण्यात येणार आहे.

मांगोर हिल जंक्शनपासून बायणाकडे जाणाऱ्या अंतर्गत रस्त्यावर, अल्टो ब्रिटो स्पोर्ट्स क्लब जंक्शनच्या अगोदर आणि नंतर सुमारे १५ मीटर अंतरावर एक हंप प्रकारचा गतिरोधक उभारण्यात येणार आहे.

सिद्धिविनायक वाड्यापासून सेंट तेरेझा शाळेकडे जाणाऱ्या अंतर्गत रस्त्यावर, अल्टो ब्रिटो स्पोर्ट्स क्लब जंक्शनच्या अगोदर आणि नंतर सुमारे १५ मीटर अंतरावर एक हंप प्रकारचा गतिरोधक उभारण्यात येणार आहे. आणि वास्को येथील राजा तारा इमारतीजवळील टिळक मैदान जंक्शनच्या सुमारे १५ मीटर अंतरावर टिळक मैदान जंक्शनपासून खारीवाडाकडे जाणाऱ्या अंतर्गत रस्त्यावर एक हंप प्रकारचा गतिरोधक उभारला जाईल. दंडाधिकाऱ्यांनी आवश्यक ते सूचना फलकही उभारण्याचे आदेश दिले आहेत.

---

### सुर्ल येथे 'आडचो आजो'चा रविवारी वर्धापनदिन

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. ५ :** घाडीवाडा–सुर्ल येथील श्री आडचो आजो मूर्ती स्थापनेचा ननवा वर्धापनदिन सोहळा रविवार दि. ९ रोजी होणार आहे. सकाळी सुवासिनींतर्फे गंगापूजन व जलाभिषेक, त्यानंतर विविध धार्मिक विधी होतील. दुपारी १ ते ३ यावेळेत महाप्रसाद होईल. संध्याकाळी ५ वाजता भजनाचा कार्यक्रम रात्री ८.३० वाजता 'फोटिंग तू' हा नाट्यप्रयोग सादर करण्यात येईल.

सोमवार दि. २० रोजी सकाळी विविध धार्मिक विधी, दुपारी १.३० ते ३ वाजेतपर्यत महाप्रसाद होईल. संध्याकाळी ६ वाजता भजनाचा कार्यक्रम, रात्री ८.३० वाजता 'आय एम सॉरी पप्पा' आणि 'सासूमाय माझी बिहारी' या दोन एकांकिका सादर करण्यात येतील.

---

# राज्य सरकारचा 'यंग इनोव्हेटर पुरस्कार' उपक्रम सुरू

## समस्या सोडवण्याच्या कौशल्यांना प्रोत्साहन मिळणार | विद्यार्थ्यांना स्पर्धेत भाग घेण्याचे आवाहन

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. ५ : राज्य सरकरच्या विज्ञान, तंत्रज्ञान आणि कचरा व्यवस्थापन विभागाअंतर्गत गोवा राज्य नवोन्मेष परिषदेने 'गोवा यंग इनोव्हेटर पुरस्कार' सुरू केला आहे, जो शालेय विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता आणि समस्या सोडवण्याच्या कौशल्यांना प्रोत्साहन देण्यासाठी एक उपक्रम आहे.फातोर्डा येथे पत्रकार परिषदेत स्पर्धेची घोषणा करताना, विज्ञान, तंत्रज्ञान आणि कचरा व्यवस्थापन संचालक अंकित यादव यांनी लहानपणापासूनच नवोन्मेषाला चालना देण्याचे महत्त्व अधोरेखित केले. नवोन्मेष हा प्रगतीचा कणा आहे आणि आपण आपल्या विद्यार्थ्यांमध्ये लहान वयातच सर्जनशीलता निर्माण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे,असे ते म्हणाले.

इयत्ता आठवी ते नववी आणि इयत्ता पाचवी ते सातवी या दोन श्रेणीतील सर्व विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा खुली आहे . प्रत्येक श्रेणीतील विजेत्यांना रोख बक्षिसे मिळतील. प्रथम क्रमांकासाठी ₹२० हजार , दुसऱ्या क्रमांकासाठी १० हजार तर तिसऱ्या क्रमांकासाठी ५ हजारांचे बक्षीस ठेवण्यात आले आहे. आर्थिक बक्षिसांव्यतिरिक्त, सर्वोत्तम प्रकल्पांना मार्गदर्शन आणि नाविन्यपूर्ण सुविधांमध्ये प्रवेश मिळेल, ज्यामुळे विद्यार्थ्यांना तज्ञांशी संवाद साधता येईल आणि त्यांच्या कल्पना अधिक परिष्कृत करता येतील.

कार्यक्रमात बोलताना, नोरोन्हा यांनी निदर्शनास आणून दिले की, चीनसारख्या देशांच्या तुलनेत भारत पेटंट दाखल करण्यात मागे आहे. चीन दरवर्षी १.६ दशलक्ष पेटंट दाखल करतो. तर भारत फक्त ५ हजार पेटंट दाखल करतो. नवोपक्रम वाढवण्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान शिक्षण मजबूत करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.



फादर डी'क्रूझ यांनीही असेच मत मांडले आणि सांगितले की डॉन बॉस्को कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मधील विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक प्रवासाच्या अखेरीस व्यावहारिक उपाय विकसित करून नाविन्यपूर्ण प्रकल्पांवर काम करण्यास प्रोत्साहित केले जाते.स्पर्धेमध्ये दाखल केलेल्या प्रकल्पांचे मौलिकता आणि व्यावहारिक उपयुक्तता यावर मूल्यांकन केले जाईल. शाळा, शिक्षक आणि पालकांना सहभागाला प्रोत्साहन देण्याचे आवाहन केले जात आहे आणि एक प्रदर्शनही आयोजित केले जाईल जिथे विद्यार्थी त्यांचे नवोपक्रम प्रदर्शित करू शकतील आणि भविष्यातील सहभागींना प्रेरणा देऊ शकतील.

या स्पर्धेत अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख २८ फेब्रुवारी २०२५ असून विजेत्याची घोषणा मार्च २०२५ मध्ये केली जाईल. याबाबत अधिक तपशीलांसाठी ०८३२ २७४ ०००७ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच गोव स्टेट इनोव्हेटीव्ह काऊन्सिलच्या अधिकरू वेबसाईटवर जाऊनही या स्पर्धेत ऑनलाईन अर्ज दाखल करण्याची सुविधा ठेवण्यात आली आहे.

---

# आगोंदच्या सरपंचपदी नीलेश पागी

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. ५ :** आगोंद पंचायत सरपंचपदी धवळखाजन प्रभागाचे पंचसदस्य नीलेश पागी यांची आज दि. ५ रोजी पंचायत कार्यालयात झालेल्या बैठकीत गटविकास अधिकारी कार्यालयाचे प्रतिनिधी व निरिक्षक सुशांत नाईक यांनी बिनविरोध निवड झाली असल्याची घोषणा केली.

यावेळी आगोंद पंचायतीच्या सातपैकी ५ पंचसदस्य उपस्थित होते तर पंचसदस्या व माजी सरपंच प्रिटल फेर्नांडीस व पंचसदस्य जोन फेर्नांडीस अनुपस्थित होते. ४ पंचसदस्यांनी एकत्र एऊन अविश्वास ठरावाची नोटीस दि.४ फेब्रुवारी रोजी, काणकोण गटविकास अधिकारी कार्यालयात दाखल केली होती.

या अविश्वास ठराव नोटीसीवर पंचसदस्य निलेश पागी, फातिमा रॉड्रिग्स, केनिशा फेर्नांडीस, रामनाथ पुरसो वेळीप यांचे हस्ताक्षर केले होते. मात्र नंतर उपसरपंच करुणा फळदेसाई या या गटात सामील झाल्या. मंगळवार दि. २८ जाने. रोजी चर्चा करण्यात आली होती. तेव्हा ५ मतानी अविश्वास ठराव मंजुर झाला होता. सरपंचपदी नीलेश पागी यांची घोषणा झाल्याबद्दल सभापती रमेश तवडकर, मंडळ अध्यक्ष प्रभाकर गावकर, उपसरपंच करुणा फळदेसाई, फातिमा रॉड्रिग्स, केनीशा फेर्नांडीस, रामनाथ वेळीप, माजी पंचसदस्य बादल नाईक गावकर, बरसात नाईक गावकर व अन्य यांनी खास अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.




**आगोंद : सरपंचपदी नीलेश पागी यांना शुभेच्छा देताना सभापती रमेश तवडकर. मंडळ अध्यक्ष प्रभाकर गावकर, उपसरपंच करुणा फळदेसाई, फातिमा रॉड्रिग्स, केनीशा फर्नांडिस, रामनाथ वेळीप, माजी पंचसदस्य बादल नाईक गावकर, बरसात नाईक गावकर व इतर.**

---

# कुंभमेळ्यासाठी तीन विशेष रेल्वेगाड्यांचे आयोजन

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ५ :** राज्य सरकारने मंगळवारी जाहीर केले की फेब्रुवारीमध्ये प्रयागराज येथे होणाऱ्या महाकुंभमेळ्यासाठी जाणाऱ्या भाविकांना प्रवास सुलभ करण्यासाठी तीन विशेष रेल्वे गाड्यांचे आयोजन केले आहे. प्रत्येक गाडी १ हजार प्रवाशांना घेऊन निघेल.

६, १३ आणि २१ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजता मडगाव येथून या तीन रेल्वे प्रवासाला हिरवा झेंडा दाखवला जाईल. ही यात्रा ३४ तासांची असेल आणि ही ट्रेन प्रयागराजच्या आधी एका स्टेशनवर थांबेल जिथून यात्रेकरूंना स्थळी जाण्यासाठी स्वतःची व्यवस्था करावी लागेल.

ज्यांना कोणतीही मोठी आरोग्य समस्या नाही तेच केवळ सुधारित मुख्यमंत्री देव दर्शन यात्रा योजनेअंतर्गत प्रवास करण्यास पात्र असतील त्यांना त्याबाबतची हमीपत्र द्यावे लागेल., या उपक्रमाचा उद्देश अशा भाविकांना मदत करणे आहे ज्यांना प्रवासाचा उच्च खर्च परवडत नाही असे राज्य सरकारकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

बरेच लोक जायचे आहेत पण विमान भाडे आणि रेल्वे प्रवासाचा खर्च परवडत नसल्यामुळे ते जाऊ शकत नाहीत हे लक्षात घेऊन हा उपक्रम आखला गेल्याचे सरकारकडून सांगण्यात आले. १८–६० वयोगटातील नागरिकांना प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर या गाड्यांमध्ये त्यांची जागा आरक्षित करता येईल. खबरदारीचा उपाय म्हणून प्रवासासाठी वैद्यकीय आणि पॅरा–मेडिकल टीमची व्यवस्था केली जाणांर आहे.

---

# हवामान–प्रतिरोधक प्रकल्पासाठी काक्रा, हरमलची निवड

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ५ :** किनारी मत्स्यव्यवसायाला महत्त्वपूर्ण चालना देण्यासाठी, प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजनेअंतर्गत हवामान–प्रतिरोधक तटीय मच्छीमार गावे म्हणून विकसित करण्यासाठी भारतातील १०० गावांमध्ये तिसवाडीतील काक्रा आणि पेडणेमधील हरमल या गावांची निवड करण्यात आली आहे. या उपक्रमाचा उद्देश ही गावे आर्थिकदृष्ट्या सशक्त आणि मासेमार समुदायासाठी शाश्वत बनवणे आहे.

मत्स्यव्यवसाय मंत्री नीलकंठ हळर्णकार यांनी बुधवारी आमदार रुडोल्फ फर्नांडिस आणि जीत अरोलकर यांच्यासमवेत या गावांच्या विकास योजनेवर चर्चा करण्यासाठी बैठक घेतली. मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय मंत्रालयाच्या नेतृत्वाखालील या प्रकल्पाला केंद्र सरकारकडून पूर्णपणे निधी दिला जाईल, मत्स्यव्यवसाय पायाभूत सुविधा आणि संबंधित सुविधांच्या उन्नतीसाठी प्रति गाव रु. २ कोटी चा निधी दिला जाईल.

या योजनेअंतर्गत, ७०% निधी पायाभूत सुविधांच्या विकासासाठी वापरला जाईल, तर ३०% निधी मत्स्यव्यवसायाशी संबंधित आर्थिक उपक्रमांसाठी वाटप केला जाईल. राष्ट्रीय मत्स्यव्यवसाय विकास मंडळ हैदराबाद, ज्याला नोडल एजन्सी म्हणून नियुक्त केले आहे, या एजन्सीने प्रकल्प अंमलबजावणी संस्था द्वारे तयार केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवाल ला मान्यता दिली आहे.या उपक्रमात मासे सुकवण्याचे यार्ड, प्रक्रिया केंद्रे, बाजारपेठा, मासेमारी जेट्टी, बर्फाचे संयंत्र, शीतगृह आणि आपत्कालीन बचाव सुविधा यासारख्या प्रमुख पायाभूत सुविधांचा समावेश केला जाईल.

याव्यतिरिक्त, हा प्रकल्प समुद्री शेवाळ लागवड, कृत्रिम रीफ, समुद्री पशुपालन, हरित इंधन स्वीकारणे आणि मच्छीमार आणि त्यांच्या जहाजांसाठी वाढीव सुरक्षा उपायद्वारे हवामान–लवचिक मत्स्यव्यवसायला प्रोत्साहन देईल.या कार्यक्रमात उपजीविका आणि पोषण समर्थन, विमा योजना आणि किसान क्रेडिट कार्ड कव्हरेजचा विस्तारयांचा समावेश आहे जेणेकरून मच्छीमारांना आर्थिक सुरक्षा मिळेल. आधुनिक हवामान–अनुकूल पद्धती एकत्रित करताना या योजनेतून किनारी मासेमारी समुदायांना शाश्वत आर्थिक चालना मिळेल अशी अपेक्षा आहे.

---

# उत्तर गोवा जिल्हाधिकाऱ्यांची थिवीच्या कोमुनिदादला क्लीन चीट

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ५ :** उत्तर गोवा जिल्हाधिकारी स्नेहा गिट्टे, यांनी डग्लस सिक्केरा यांनी दाखल केलेली याचिका फेटाळून लावली आहे, ज्यामध्ये मंजुरी न घेता भूखंडांचा बेकायदेशीर विकास आणि संहितेच्या अंतर्गत प्रक्रियेचे पालन न करणे याविरुद्ध कारवाई करण्याची मागणी केली आहे.

गोवा येथील मुंबई उच्च न्यायालयाने ऑगस्ट २०२३ मध्ये डग्लस सिक्केरा यांनी थिवीच्या कोमुनिदाद विरुद्ध दाखल केलेल्या याचिकेवर उत्तर गोवा जिल्हाधिकाऱ्यांकडून चौकशीचे आदेश दिले होते, ज्यामध्ये कथित प्रक्रियात्मक त्रुटी, फसव्या प्रक्रिया तसेच कागदपत्रांमध्ये फेरफार, भूखंड वाटपाचे गैरव्यवस्थापन आणि संहितेच्या निधीचा गैरवापर यांचा समावेश होता.

चौकशीनंतर, जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या ४५ पानांच्या आदेशात असा निष्कर्ष काढला आहे की थिवीच्या कोमुनिदादने संहितेच्या नियमांनुसार निर्धारित प्रक्रियांचे काटेकोरपणे पालन केले होते आणि परिणामी सिक्केरा यांनी थिवीच्या कोमुनिदाद विरुद्ध केलेले सर्व आरोप आणि आक्षेप फेटाळून लावले.सखोल चौकशीनंतर, जिल्हाधिकाऱ्यांनी थिवीच्या कोमुनिदादने उच्च न्यायालयाच्या मागील निर्देशांचे आणि सादर केलेल्या सर्व बाबींचे पालन केल्याचे मान्य केले.

त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी याचिकाकर्त्याचे अपील फेटाळून लावले. आदेशानंतर, थिवीच्या कोमुनिदादच्या निवडून आलेल्या समिती सदस्यांनी सांगितले की ते गावकरांची सेवा करण्यास वचनबद्ध आहेत आणि त्यांना बिनशर्त पाठिंबा देत राहतील. दुसरीकडे, सिक्केरा म्हणाले की ते जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला आव्हान देण्यासाठी पुन्हा उच्च न्यायालयात जातील.

---

# महिला कॉन्स्टेबलने केली लाखोंची अफरातअफर

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. ५ :** डिचोली पोलिस ठाण्यात कार्यरत असलेल्या एका महिला कॉन्स्टेबलने लाखो रुपयांची अफरातफर केल्याचे वरीष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या लक्षात येताच या महिला कॉन्स्टेबलला सेवेतून निलंबीत करण्यात आले आहे. एस्कॉर्ट विभागात कार्यरत असलेल्या या महिला कॉनस्टेबलने हडप केलेली रक्कम पुन्हा वरीष्ठ अधिकाऱ्यांकडे सुपूर्द केली असल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली आहे. वाहतूक विभागाने गेल्या ११ महिन्यात वसूल केलेल्या दंडाच्या रकमेपैकी या कॉन्स्टेबलने १७.३० लाख रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे प्राथमिक चौकशीत निष्पन्न झाले.

वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी वाहतूक पोलिसांनी आकारलेला दंड संबंधीत वाहन चालकांनी त्यांच्या क्षेत्रातल्या नजीकच्या पोलिस स्थानकात जाऊन जमा करायचा असतो . डिचोली पोलिस स्थानकात हा दंड जमा करून घेण्याचे काम सदर महिला कॉनस्टेबलकडे सोपवण्यात आले होते . पावतीनुसार या कॉन्स्टेबलने वाहनाचालकांकडून दंड वसूल केला . मात्र अधिकृत बँक ठेव पावत्या आणि अंतर्गत वाहतूक पोलिसांच्या नोंदींमध्ये तफावत आढळल्याने पोलिस अधीक्षक (वाहतूक) प्रबोध शिरवाईकर यांनी एसपी उत्तर अक्षत कौशल यांना सूचना दिली. डिचोली पोलिस निरीक्षकांनी केलेल्या प्राथमिक चौकशीत गैरव्यवहाराची पुष्टी झाल्याचे आढळून आले, ज्यामुळे एसडीपीओंनी सविस्तर चौकशी सुरू केली. त्यानुसार १७.३० लाख रुपये बँकेत जमा नसल्याचे आढळून आले. तिला सेवेतून निलंबीत करण्यात आले . त्यानंतर या महिला कॉन्सटेबल ने सदरची रक्कम मंगळवारी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सुपूर्द केली.

या सगळ्या प्रकारची गंभीर दखल घेत उतर गोवा पोलिस अधीक्षकांनी एसपी उत्तर यांनी जिल्ह्यातील सर्व पोलिस ठाण्यांना मंगळवार संध्याकाळपर्यंत विविध मोटार वाहन उल्लंघनांमधून वसूल केलेल्या दंडाची माहिती सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच गोवा पोलिसांनी नवीन आर्थिक वर्षापासून वाहतूक दंडासाठी कॅशलेस चलन पेमेंटकडे वळण्याचा निर्णय घेतला आहे.डिसेंबर २०२४ मध्ये, हणजूण वाहतूक कक्षाचे सहाय्यक उपनिरीक्षक मोहन चोपडेकर आणि कॉन्स्टेबल गोविंद मांद्रेकर आणि प्रशांत शेट्ये यांना पर्यटकांकडून लाच घेतल्याच्या आरोपाखाली निलंबित करण्यात आले आहे.

